# महान सम्राट अशोक

मंजूषा सु. मुळे

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**महान सम्राट अशोक**
मंजूषा सु. मुळे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
मंजूषा सु. मुळे
फ्लॅट नं. ४, श्रीयश सोसायटी,
५७१/५७२ केंजळेनगर,
पुणे. मो. नं. : ९८२२८४६७६२

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३५०/-

# महान सम्राट अशोक

महान सम्राट अशोक
महान सम्राट अशोक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | अशोकची जडणघडण.................................... | ७ |
| २. | बालपण आणि सुरुवातीचा काळ........................ | ३४ |
| ३. | कलिंगची लढाई ........................................ | ६२ |
| ४. | अशोकस्तंभ............................................. | ६७ |
| ५. | सम्राट अशोकची सदसद्‌विवेकबुद्धी...................... | ८२ |
| ६. | कशाबद्दलही खेद न बाळगणारा सम्राट................... | ९१ |
| ७. | सम्राट अशोकने केलेल्या सुधारणा........................ | १०६ |
| ८. | अशोकबद्दलच्या आख्यायिका........................... | ११५ |
| ९. | अशोकने काढलेली विविध फर्माने....................... | १५८ |
| १०. | अशोकने केलेली बांधकामे............................... | १९२ |
| ११. | अशोकचा धर्म........................................... | २११ |
| १२. | अशोकची धर्माबाबतची धोरणे ......................... | २२९ |
| १३. | अशोक आणि इतर मौर्य राजे यांचे परदेशांसोबत असणारे संबंध........................ | २४३ |
| १४. | मौर्य काळातील कलाकारी............................... | २५८ |
| १५. | सम्राट अशोकचे वारस.................................... | २७५ |


✦✦✦

# अशोकची जडणघडण

खिस्तपूर्व ३०४ ते खिस्तपूर्व २३२ असं बाहत्तर वर्षांचं आयुष्य लाभलेला अशोक, हा 'अशोक दि ग्रेट' म्हणूनच सर्वदूर सुपरिचित होता. मौर्य राजवंशात जन्मलेला हा असा हिंदू सार्वभौम राजा होता, ज्याने खिस्तपूर्व २६९ ते २३२ एवढा प्रदीर्घ काळ, जवळजवळ संपूर्ण भारतीय उपखंडावर राज्य केले. भारतातला एक अतिशय महत्त्वपूर्ण आणि उत्तम सम्राट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोकने अनेक लढाया जिंकून काबीज केलेल्या, आताच्या भारतातल्या बहुतेक सर्व भागावर राज्य केले. आत्ताचा पाकिस्तान आणि त्याच्या पश्चिमेकडे असणारा अफगाणिस्तान इथपासून ते आत्ताचा बांग्लादेश आणि भारताच्या पूर्वेकडच्या आसाम राज्यापर्यंत आणि खाली उत्तर केरळ आणि आंध्र राज्यापर्यंत त्याचे साम्राज्य पसरलेले होते. तेव्हाचे ख्यातनाम कलिंग राज्य, जे चंद्रगुप्त मौर्यापासून पुढे त्याच्या वंशातल्या कोणालाच जिंकता आले नव्हते, तेही अशोकने जिंकून घेतले होते. त्याच्या राज्याची राजधानी मगध येथे होती. मगध म्हणजे आताच्या भारतातील बिहार. कलिंगबरोबर झालेल्या युद्धात, ते युद्ध जिंकण्याच्या प्रखर ईर्ष्येने त्यानेच घडवून आणलेला प्रचंड नरसंहार जेव्हा त्याने प्रत्यक्ष युद्धभूमीवर स्वत:च्या डोळ्यांनी पाहिला, तेव्हा उद्वेगाने त्याने प्रचलित वैदिक परंपरा झुगारून दिली आणि बौद्ध पंथ स्वीकारला. पुढे पूर्ण आशिया खंडात बौद्ध धर्माचा प्रसार करण्याच्या कामात त्याने स्वत:ला झोकून दिले. भगवान गौतम बुद्धांच्या आयुष्यात जेथे जेथे वेगवेगळे महत्त्वपूर्ण प्रसंग घडले होते, त्या त्या जागी त्याने स्मारके उभारली. अशोक हा अहिंसा, प्रेम, सत्य, सहिष्णुता आणि शाकाहारी जीवनप्रणाली यांचा कट्टर पुरस्कर्ता होता आणि स्वत:चे आयुष्य त्याने याच तत्त्वांसाठी- त्यांच्या प्रसारासाठी वाहून घेतले होते. एक अतिशय परोपकारी प्रशासक अशीच इतिहासाला त्याची ओळख आहे. भारतीय इतिहासात अशोकाचा उल्लेख नेहमी 'सम्राट चक्रवर्ती अशोक' असाच केला जातो. म्हणजे, 'सम्राटांचा सम्राट अशोक' हीच त्याची कायमस्वरूपी ओळख बनलेली आहे.

'अशोक' या त्याच्या नावाचा संस्कृत भाषेतील अर्थ आहे अ-शोक, शोकाविना असणारा, दु:खमुक्त, चिंतामुक्त असणारा. त्याची जी वेगवेगळी आज्ञापत्रे किंवा

आदेश आहेत, त्यामध्ये त्याचा उल्लेख 'देवानाम प्रिय:' म्हणजे 'देवाला प्रिय असणारा' आणि 'प्रियदर्शी'/'प्रियदस्सी' किंवा 'जो प्रेमाने प्रत्येक व्यक्तीकडे पाहतो' असा केलेला आढळतो. त्याची आणखी एक ओळख म्हणजे त्याचा 'धम्म', 'कायद्याला किंवा नियमांना धरून चालणारा, अतिशय श्रद्धापूर्वक पाळला जाणारा आणि सदाचरण शिकवणारा त्याचा धम्म.' सुप्रसिद्ध ब्रिटिश लेखक आणि सामाजिक विषयांचे समीक्षक श्री. एच्. जी. वेल्स यांनी त्यांच्या दोन खंडांमध्ये लिहिलेल्या 'द आऊटलाईन ऑफ हिस्टरी' (१९२०) या सर्वोत्तम खप असणाऱ्या पुस्तकात सम्राट अशोकबद्दल असे लिहिले आहे. की, 'जगाच्या इतिहासात असे हजारो राजे आणि सम्राट होऊन गेले जे स्वत:ला 'हिज हायनेस', 'हिज मॅजेस्टीज', 'हिज एक्झॉल्टेड मॅजेस्टीज' आणि अशा त्यांचे उच्चपद दर्शवणाऱ्या इतर अनेक पदव्या लावून घेत असत. हे सगळेजण काही काळापुरते प्रसिद्ध झाले आणि मग झटकन विस्मृतीतही गेले; पण सम्राट अशोक! तो मात्र एखाद्या तेजस्वी ताऱ्यासारखा सतत तळपतच राहिला आहे, अगदी आजपर्यंत.''

अशोकच्या आज्ञापत्रांप्रमाणेच त्याच्याबद्दलच्या आख्यायिकाही, थेट दुसऱ्या शतकातील 'अशोकवंदन' (अशोकाच्या गोष्टी) 'दिव्यवंदना' (दैवी गोष्टी) आणि श्रीलंकन ग्रंथ 'महावंश' अशा विविध ग्रंथांमुळे लोकांपर्यंत पोहोचल्या आहेत.

तब्बल दोन हजार वर्षे उलटून गेल्यानंतरही आशिया खंडात आणि विशेष करून भारतीय उपखंडात अजूनही सम्राट अशोकचा प्रभाव टिकून असलेला दिसतो. त्याच्या साम्राज्यातल्या उत्खननात सापडलेले प्रतीकचिन्ह, आज भारताचे राष्ट्रीय प्रतीक चिन्ह बनलेले आहे. बौद्ध पंथाच्या इतिहासात तर गौतम बुद्धांच्या नंतर सम्राट अशोकाला मानले जाते.

## जीवनचरित्र

अशोक हा मौर्य सम्राट बिंदुसार आणि त्याची राणी धर्मा यांचा मुलगा. ही राणी जरी ब्राह्मण होती म्हणजे तेव्हाच्या प्रथेनुसार 'सुभद्रांगी' होती, तरी ती राजवंशातली नसल्यामुळे ती राजाच्या तुलनेत कमी योग्यतेची आहे असेच त्या काळी मानले जात असे. अशोकला बरीच मोठी भावंडेही होती; पण ती त्याचे वडील बिंदुसार यांच्या इतर बायकांना झालेली होती. त्याला सख्खा असा एकच लहान भाऊ होता, ज्याचं नाव होतं 'विठ्ठशोक.' अशोकची वाखाणण्यासारखी बुद्धिमत्ता आणि त्याचे उपजत असलेले युद्धकौशल्य यामुळे त्याचे आजोबा चंद्रगुप्त मौर्य यांचा तो सर्वात लाडका

नातू होता असे म्हटले जात असे. एका प्रचलित आख्यायिकेनुसार, जैन धर्म अनुसरायचा म्हणून चंद्रगुप्त मौर्याने जेव्हा आपल्या साम्राज्याचा त्याग केला, तेव्हा त्याने आपली तलवारच लांब फेकून दिली होती. ती न घेण्याबद्दल या आजोबांनी सक्त ताकीदही नातवाला दिली होती. तरीही अशोकने ती शोधून काढली आणि स्वत:जवळ ठेवून घेतली. तारुण्यात पदार्पण करण्याच्या वयात अशोक एक उद्धट आणि खोडकर मुलगा होता. तो एक भयंकर आणि धाडसी शिकारी होता. तो क्षत्रिय होता आणि उच्च प्रतीचे सैनिकी शिक्षण आणि इतर वैदिक ज्ञान त्याला आवर्जून दिले गेले होते. एका दंतकथेनुसार फक्त एका लाकडी दांडक्याने अशोकने एक सिंह मारला होता. तलवारबाजीसाठी तर अशोक खूपच सुप्रसिद्ध होता. तो अतिशय साहसप्रियही होता आणि या सगळ्यामुळे तो एक भयंकर शूर असा लढवय्या म्हणून ओळखला जात असे. तसेच समोरच्या प्रतिस्पर्ध्याला घाबरवून टाकणारा योद्धा आणि निष्ठुर सेनापती अशीही अशोकची ख्याती होती. त्याच्या या गुणविशेषांमुळेच अवंतीमधील गोंधळाचा, उद्रेकाचा नायनाट करण्यासाठी त्याला पाठवले गेले होते.

## सामर्थ्य-प्रदर्शनाची सुरुवात

सैन्याचा एक निर्दोष आणि परिपूर्ण सेनापती तसेच एक धूर्त आणि मुत्सद्दी राजकारणी अशीच ओळख व्हावी, असा घडलेला अशोक. मौर्य सैन्यातल्या अनेक तुकड्यांवर त्याचीच हुकमत होती. पूर्ण साम्राज्यभर पसरत चाललेली त्याची लोकप्रियता पाहता, भावी सम्राट म्हणून बिंदुसार राजा त्यालाच संधी देईल, या विचाराने अशोकचे मोठे भाऊ खूप सावध झाले होते. यातला सगळ्यात मोठा भाऊ म्हणजे सुसिमा. वंशपरंपरेनुसार राजमुकुटाचा खरा अधिकारी सुसिमा होता. हा राजपुत्र पाकिस्तानी पंजाब प्रांताचा प्रशासक होता. या प्रांतातील तक्षशिला शहरात सुरू झालेलं बंड मोडून काढण्यासाठी अशोकला पाठवावे, यासाठी बिंदुसार राजाचे मन वळवण्याची त्याची धडपड चालू होती. इंडो-ग्रीक जनतेत निर्माण झालेली युद्धसदृश्य परिस्थिती आणि स्वत: सुसिमाचा अनागोंदी, ढिसाळ कारभार, यामुळे तक्षशिला हे एक अत्यंत अस्थिरता माजलेले ठिकाण झाले होते. याचा परिणाम म्हणून वेगवेगळ्या नागरी सेना तिथे कार्यरत झाल्या होत्या, होत होत्या आणि त्यामुळेच सगळीकडे अशांतता, अस्थिरता वेगाने पसरत होती. अशोकने हे आव्हान स्वीकारले आणि तो तक्षशिलेला गेला. अशोक

आपले सैन्य घेऊन येत आहे ही बातमी जशी हळूहळू सगळीकडे पसरली, तसे तिथल्या सगळ्या बंडखोर नागरी सेनांनी त्याचे स्वागतच केले आणि कुठल्याही संघर्षाशिवायच तिथले बंड शमले. (अशोक राज्यकारभार पाहात असताना, या प्रांतात नंतर पुन्हा एकदा बंडाळी माजली; पण त्यावेळी अत्यंत कठोरपणाने ते बंड चिरडून टाकले गेले.)

अशोकचे असे सगळे यश पाहता, त्याचाही हेतू स्वत: सम्राट बनण्याचाच आहे या काळजीने त्याचे सावत्र भाऊ आणखीच सावध झाले आणि त्यातल्या सुसिमाच्या सतत मागे लागण्यामुळे त्याच्याच सततच्या चिथावणीमुळे अखेर बिंदुसाराने अशोकला हद्दपार केले. तिथून निघून अशोक कलिंग देशात गेला आणि तिथे अज्ञातवासात राहिला. तिथे त्याला मच्छीमार जमातीतली कौरवाकी नावाची एक स्त्री भेटली आणि अशोक तिच्या प्रेमात पडला. अलीकडेच सापडलेल्या काही दस्तांवरून असे दिसते की, ही स्त्री पुढे त्याची दुसरी किंवा तिसरी राणी होणार असावी.

मध्यंतरीच्या काळात उज्जैनमध्ये पुन्हा हिंसक स्वरूपाचे बंड उसळले. जवळजवळ दोन वर्षांनंतर सम्राट बिंदुसाराने, अशोकची हद्दपारी संपली असल्याचे फर्मान जारी केले. अशोक उज्जैनला गेला आणि तिथे चालू केलेल्या लढाईत जखमी झाला; पण त्याच्या सेनापतीने बंड मोडून काढले. अशोकवर गुप्तपणे उपचार केले गेले, त्यामुळे सुसिमाच्या गटातील त्याचे इमानी सेवक अशोकला कोणत्याच प्रकारे हानी पोहोचवू शकले नाहीत. बौद्ध साधू आणि साध्वींनी त्याच्यावर उपचार केले, त्याची सेवा- शुश्रूषा केली. याच ठिकाणी त्याचा बुद्धांच्या शिकवणीशी, उपदेशाशी पहिल्यांदा परिचय झाला आणि इथेच त्याची देवीशी गाठ पडली. देवी ही त्याची व्यक्तिगत परिचारिका होती आणि शेजारच्याच विदिशा राज्यातल्या एका व्यापाऱ्याची मुलगी होती. या दुखण्यातून बरा झाल्यानंतर अशोकने देवीशी विवाह केला. आपल्या मुलाने एखाद्या बौद्धधर्मीय मुलीशी विवाह करावा हे बिंदुसाराला मान्य होणे शक्यच नव्हते. त्यामुळे त्याने अशोकला पाटलीपुत्र नगरीत राहण्यास मनाई केली आणि त्याऐवजी उज्जैनचा प्रशासक म्हणून त्याला परत उज्जैनला पाठवले.

पुढचं वर्ष अशोकसाठी तसं शांततेतच गेलं. त्याच वर्षी त्याची पत्नी देवी, ही अशोकच्या पहिल्या पुत्राला जन्म देणार होती. या मधल्या सगळ्या काळातच सम्राट बिंदुसाराचा मृत्यू झाला. अशोकचा तोपर्यंत जन्मालाही न आलेला मुलगाच